


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३१०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२१ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिराचा सभामंडप कोसळला

## ४ जणांचा मृत्यू, २१ जण जखमी !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, परभणी :** परभणीच्या मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरात दुखद घटना घडली आहे. मंदिराच्या बाहेर सभा मंडपाचा काही भाग कोसळला आहे. या सभा मंडपाचं काम सुरु होतं. पण आज शनिवार असल्या कारणास्तव अनेक भाविक मंदिरात दर्शनासाठी आले होते. पण यापैकी काही भाविकांवर सभा मंडपाचा भाग कोसळला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या घटनेत आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २१ जण या घटनेत जखमी जखमी झाले आहेत. जखमींवर सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या धक्कादायक घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आला आहे. घटनेचा सीसीटीव्ही फुटेज हा मन विचलित करणारा आहे.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. या घटनेनंतर माझे जिल्हाधिकाऱ्यांशी बोलणं झालं आहे. घटना घडली तेव्हा माझे सहकारी तथा एक जिल्हा परिषद सदस्य हे घटनास्थळी होते. घटना घडल्यानंतर तातडीने बचावकार्य सुरु करण्यात आलं. या बचावकार्यातून जखमींना बाहेर काढण्यात आलं. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. खूप मोठ्या संख्येने भाविक त्या ठिकणी येतात म्हणून ही घटना घडली असावी. नेमकं काय झालं ते अद्याप समजलेलं नाही. पण प्रशासन बचावासाठी वेळेत पोहोचलं आहे. गंभीर जखमींवर उपचार सुरु आहेत. जखमींना लवकरात लवकर बरे करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत, असं मेघना बोर्डीकर म्हणाल्या.

यशवाडीच्या हनुमान मंदिरात दर शनिवारी ५० हजार ते एक लाख भाविक येतात. फक्त परभणीच नाही तर आजूबाजूच्या जिल्ह्यातूनही दर शनिवारी भाविक येत असतात. जेवणाच्या पंक्ती असतात. जागृत देवस्थान आहे म्हणून भाविकांच्या खूप भावना जोड्या गेल्या आहेत. एक-दीड वर्षांपासून मंदिराचे काम सुरु आहे. सुंदर अशा राजस्थानी दगडापासून हे मंदिर बनवलं जात आहे, अशी माहिती मेघना बोर्डीकर यांनी दिली.



घटनेचा सीसीटीव्ही फुटेज माझ्याकडे आलं आहे. या घटनेत २५ ते ३० भाविक सीसीटीव्हीत दिसत आहेत. त्यापैकी जवळपास २५ जण आपण बाहेर काढले आहेत. बचावकार्य सुरु आहे, अशी माहिती पालकमंत्री मेघना बोर्डिकर यांनी दिलं.

दरम्यान, या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती. मंदिराच्या परिसरात सभा मंडपाचे काम सुरु होते. शनिवार असल्याने भाविक या मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने आले होते. सभा मंडपाखाली भाविक एका रांगेत उभे होते. ते रांगेतून पुढे जात दर्शन घेत होते. मंदिराच्या गाभाऱ्याच्या बाहेर तिथेच प्रसाद देखील दिला जाताना सीसीटीव्हीत दिसत आहेत. काही भाविक मनोभावे देवाला नमस्कार करताना दिसत आहेत. पण अचानक सभा मंडप कोसळतो, असं सीसीटीव्हीत स्पष्ट दिसत आहे. या घटनेत नेमकं कोण दोषी आहे? याबाबतची माहिती समोर येईल का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## शेतकऱ्यांना १८ हजार ८८० कोटी रुपयांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या हस्तांतरण सोहळ्याचे प्रक्षेपण राहुरी कृषी विद्यापीठात संपन्न



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२०, राहुरी विद्यापीठ :** पश्चिम बंगाल येथील तारकेश्वर, हुगळी येथून देशातील नऊ कोटीं ४४ लाख शेतकऱ्यांना १८ हजार ८८० कोटी रुपयांचा पंतप्रधान किसान सन्माननिधी योजनेचा २३ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वितरित केला. यानिमित्ताने PM-KISAN उत्सव दिवस साजरा करण्यात आला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे व विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण विद्यापीठात विद्यार्थी आणि शास्त्रज्ञांसाठी करण्यात आले.

याप्रसंगी आंतरविद्याशाखा जल व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.विजयकुमार पाटील, कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रातील विषय विशेषज्ञ प्रा. अन्सारखान आत्तार, प्रगतशील शेतकरी प्रकाश गायकवाड व इतर शास्त्रज्ञ, शेतकरी, कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळी ढोकेश्वर येथील उपबाजार समितीचे काम लवकर सुरू करा : शेतकऱ्यांची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या आणि सुमारे पन्नासहून अधिक गावांच्या शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करण्याच्या दृष्टीकोनातून २५ वर्षांहून अधिक काळ जागेचा न्यायालयीन वादामुळे पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे अनेक वर्षांपासूनचे प्रयत्न आहेत. टाकळी ढोकेश्वर येथे नवीन जागेत असणारी उपबाजार समिती लवकरच चालू करण्यात यावी, अशी मागणी टाकळी ढोकेश्वर गावातील व परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथे कोट्यवधी रूपये किंमतीची जागा न्यायालयीन वादात अडकली आहे. त्यानंतर नगर कल्याण महामार्गावर उपबाजार समितीची जागा उपलब्ध असून या जागेला जाण्यासाठी रस्ताच नसल्याने ती जागाही वादाच्या भोवऱ्यात अडकली असल्याने कृषी उत्पन्न बाजार समिती पारनेर अंतर्गत टाकळी ढोकेश्वर येथील जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित असलेल्या गायरान जमिनीपैकी शासनाच्या ५ एकर जागा उपबाजार समितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर बाजार समीतीने ठराव करून पणन महामंडळाकडे प्रस्ताव दाखल केल्यानंतर संबंधित विभागाच्या परवानगी घेऊन. जिल्हाधिकारी कार्यालयाने भूमी अभिलेख कार्यालयाला जागा मोजणीचे पत्र दिले. त्यानुसार जागेची मोजणी करून जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. टाकळी ढोकेश्वर येथील उपबाजार समिती चालू झाल्यास शेतकऱ्यांना आपला शेतमाल व भाजीपाला उपबाजार समितीत विक्रीसाठी आणता येणे शक्य होणार आहे.

**“टाकळी गावाचा महसूल वाढण्यास मदत होणार असून छोटे मोठे हॉटेल व्यावसायिक, हमाल व इतर मजूर यांचे हाताला काम मिळण्यास मदत होण्याच्या दृष्टीने हि उपबाजार समिती महत्वाची ठरणार आहे. नगर- आळेफाटा- पारनेर- जुन्नर- नारायणगाव आदि तालुक्याच्या सरहद्दीवर टाकळी ढोकेश्वर हे गाव येत असल्याने तसेच वाहतुकीच्या दृष्टीने नगर कल्याण राज्यमार्ग, तसेच नव्याने होत असलेला सुपा ते संगमनेर मार्ग यामुळे वाहतुकीसाठी सोय निर्माण झाली असल्याने शेतकऱ्यांचा काढलेला ताजा शेतमाल, तरकारी, भाजीपाला लवकरच शहरात पोहचण्यास मदत होऊन शेतकऱ्यांना जागेवर योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होणार आहे.**

**“चार तालुक्याचा विचार करता शेतकऱ्यांना आळेफाटा, नगर, नारायणगाव, मंचर आणि पुणे आदी ठिकाणी आपला शेतमाल पाठवावा लागत आहे. परंतु जर टाकळी ढोकेश्वर येथील उपबाजार समिती चालू झाली तर परिसरातील वासुंदे,खडकवाडी मांडवे खुर्द, वडगाव सावताळ, देसवडे, पळशी, वनकुटे, तास, कामटवाडी,पळसपूर,काटाळवेढा,कन्हेर पोखरी, ढगेवाडी, सावरगाव पिंपळगाव रोठा,वारणवाडी, गुरेवडी, कर्जलेहार्या, कान्हुरपठार, भोंद्रे, काकणेवडी, ढोकी, धोत्रे, ढवळपुरी,गावडेवाडी,वाघवाडी, माळवाडी आदी परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. टोमॅटो उत्पादनाच्या तुलनेत मांडओहोळ आणि मुळा नदीचे बाराही महिने पाणी आणि मांडओहोळ आणि काळू नदीचा मोठा विस्तार असल्याने या भागातील शेतकरी हा तरकारी भाजीपाला पीकांचे मोठे उत्पादन घेत आहे. परंतु शेतमाल विक्रीच्या दृष्टीने विचार करता योग्य वेळेत शेतमाल बाजारात पोहचला नाही तर शेतकऱ्याला अनेकदा मोठ्या प्रमाणात नुकसानीला सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या आळेफाटा, नगर, मंचर, नारायणगाव, ओतूर येथिल बाजार समित्या यांचेपासून टाकळी ढोकेश्वर हे अंतर लांब पल्ल्याचे असल्याने शेतमाल पोहोचविण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागते.**

**“मालवाहतूक गाड्यांचे भाडे, हमाली हा खर्च उत्पन्नाच्या तुलनेत अधिक वाढणारा ठरत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य बाजारभाव मिळून शेतमाल विकण्याची व्यवस्था जवळ होऊन पारदर्शक कारभार होण्यास मदत होणार आहे. तसेच वेगवेगळ्या मार्गाने होणारी आर्थिक फसवणूक थांबून, पारदर्शी वजनमाप होऊन मालाचा योग्य मोबदला रोख स्वरूपात शेतकऱ्यांना मिळेल या दृष्टीने टाकळी ढोकेश्वर येथिल नवीन उपबाजार समितीचे काम लवकर चालू होणे गरजेचे आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतीमाल योग्य वेळेत बाजारामध्ये विकता येऊन योग्य मोबदला भेटण्यास मदत होणार असून सदरची उपबाजार समिती लवकर चालू व्हावी.**

## पुणे विभागात एसटीचे उत्पन्न वाढले! बसस्थानक परिसरातील अवैध वाहतुकीवर कारवाई

**दि.२०, पुणे :** बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीवर राज्यभर राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून, पुणे विभागाच्या एसटी उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. गेल्या १५ दिवसांमध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नात एकूण ४३ कोटी ८३ लाख रुपयांची वाढ झाली आहे. त्यात पुणे विभागाचा सर्वाधिक वाटा असून, येथील उत्पन्न सहा कोटींनी वाढले आहे.

रोजच्या कारवाईचा फायदा

एसटी स्थानकाच्या परिसरात २०० मीटर खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्यांना उभे राहण्यास बंदी आहे. तरीही पुण्यासह राज्याच्या अनेक भागात खासगी बस, कॅबचालक थांबून प्रवाशांना घेऊन जात होते. त्यामुळे एसटीला मोठा फटका बसत होता. त्यामुळे एसटी महामंडळाकडून एक जूनपासून अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाईला सुरुवात केली होती. पुण्यात शिवाजीनगर, स्वारगेट येथे दररोज कारवाई करण्यात आली. त्याचा एसटी महामंडळाला फायदा झाल्याचे दिसत आहे. गेल्या १५ दिवसांच्या कालावधीत पुणे विभागाने पाच कोटी ९७ लाख रुपयांची अतिरिक्त उत्पन्नवाढ नोंदवली आहे. बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीवर करण्यात आलेल्या कठोर कारवाईमुळे प्रवाशांचा ओढा पुन्हा एसटीकडे वाढल्याचे चित्र आहे. परिणामी, एसटीच्या दैनंदिन उत्पन्नात सरासरी तीन कोटी रुपयांवाढ झाली आहे.

प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हे सरकारचे प्राधान्य असून, अशा मोहिमांमुळे एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

कारवाई तीव्र करणार

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार आणि न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करून परिवहन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलिस आणि एसटी प्रशासनाने संयुक्तपणे ही मोहीम राबवली. या कारवाईत बसस्थानक परिसरातील अनधिकृत वाहतूक मोठ्या प्रमाणावर रोखण्यात आली. अवैध वाहतुकीमुळे एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि महसुलावर परिणाम होत असल्याची बाब लक्षात घेऊन ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पावसाने दडी मारली, देशभर हाहाकार; मान्सूनच्या विलंबामागे सोमाली जेट' हे कारण ?

**दि.२०, मुंबई :** केरळमध्ये एरवी १ जून रोजी हजेरी लावणारा मान्सून यंदा ४ जूनला दाखल झाला होता. सुरुवातील त्याचा वेगही मध्य भारतापर्यंत चांगला होता. पण पुढे सरकत असताना त्याचा वेग अचानक मंदावला. एवढच नाही तर तो गायबच झाला की काय अशाही चर्चा रंगल्या. संपूर्ण भारताला मान्सूनची प्रचंड प्रतिक्षा लागलेली आहे.

गेल्या १२ दिवसांत महाराष्ट्रात आणि तेलंगणात मान्सून सक्रीय होता, पण पावसाचा वेग मात्र काहीच दिसून आला नाही. त्यानंतर आता तो पुढे सरकेल की काय अशी वेळ आली आहे. पावसाच्या दडीमागे सोमाली जेट हे देखील एक कारण असल्याचे हवामान शास्त्रज्ञांचे मत आहे. सोमाली जेटची प्रगती पाहिजे तशी झाली नसल्याने मान्सूनचा वेग मंदावला आहे, असं म्हटलं जात आहे.

**काय आहे सोमाली जेट?**

सोमाली जेट ही एक विषुववृत्तीय वायु प्रणाली आहे जी आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याजवळ हिंद महासागरात तयार होते. भारताच्या मान्सूनसाठी महत्त्वाची असलेली सोमाली जेट 'फाईंडलेटर जेट' या नावानेही ओळखली जाते. सोमाली जेटमुळे पूर्व आफ्रिकेत तुलनेने कमी पाऊस पडतो. सोमाली जेट हा एक निम्नस्तरीय वायुप्रवाह आहे जो भारतात नैऋत्य मान्सून आणण्यास मदत करतो. सोमाली जेट कमकुवत झाला तर भारतातील मान्सूनही कमकुवत होतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या प्रणालींचाही अभाव आहे, ज्या सहसा मान्सूनला अनेक भागात ढकलण्यास मदत करत असतात. तसेच यावेळी एल निनोमुळे मान्सून कमकुवत होण्याची भीती हवामानशास्त्रज्ञ वारंवार व्यक्त करत आहेत.

**१ ते १९ जून पर्यंत ४० टक्के कमी पाऊस...**

हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या ताज्या आकडेवारीत १ जून ते १९ जून दरम्यान देशात सरासरीपेक्षा ४० टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. सहसा, १ जून ते १७ जून दरम्यान देशात सरासरी ८०.६ मिमी पाऊस पडतो, परंतु या वर्षी आतापर्यंत केवळ ४८.५ मिमी पाऊस पडला आहे. मध्य भारतात ०१ जून ते १८ जून दरम्यान सरासरीपेक्षा ६३ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे.

**२३ जूनपर्यंत छत्तीसगडला पोहोचेल...**

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आता २३ जूनपर्यंत छत्तीसगडमध्ये पावसाची शक्यता आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र, तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या काही भागांमध्ये मान्सूनने वेग धारण केला आहे.

**पाणी पुरवठ्यावर परिणाम**

मान्सूनने पाठ फिरवल्यामुळे महाराष्ट्रात पाणीटंचाई निर्माण झाली




आहे. पुण्यात सम-विषम पाणीपुरवठा प्रणाली लागू करण्यात आली आहे. मुंबईत उकाड्यामुळे हैराण नागरिक रात्रीच्यावेळी समुद्रकिनाऱ्यावर जात आहेत. मुंबईत ११ जून रोजी पावसाचे आगमन अपेक्षित होते, परंतु तसे अद्याप झालेले नाही. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २१ ते २३ जून दरम्यान पश्चिम मध्य प्रदेशात मेघगर्जनेसह पाऊस आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्रातील विदर्भात १९ ते २३ जून दरम्यान असेच हवामान अपेक्षित आहे.

**खरीप हंगामाला उशीर**

महाराष्ट्रात मान्सूनने उशिर केल्यामुळे खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच त्याचा परिणाम दिसू लागला आहे. राज्य कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, जून महिन्याच्या मध्यापर्यंत राज्यात केवळ १ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. साधारणपणे या वेळेपर्यंत अनेक जिल्ह्यांमध्ये पेरणीचे काम वेगाने सुरू असते, परंतु पाऊस गायब असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत आणि पावसाकडे लक्ष ठेऊन आहेत.

## संपादकीय

### आंतरराष्ट्रीय योग दिन



आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला. २१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनीधी आहेत. याप्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दीनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे. आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**– श्याम ठाणेदार**

# पितृ देवो भव !

मातृदेवो भव, पितृदेवो भव असे आपली भारतीय संस्कृती सांगते. आजच्या 'डेज संस्कृती'च्या काळात फादर्स डे साजरा करताना आपण एक गोष्ट विसरता कामा नये की, भारतीय परंपरेने आई-वडिलांना देवाचे स्थान दिले आहे. ही आपली वेगळी सांस्कृतिक ओळख संपूर्ण जगाने समजून घेतली पाहिजे.

मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉईड यांच्या मते, धार्मिक व्यक्तीची विश्वनिर्मितीची कल्पना आणि मुलांची स्वतःच्या जन्मदात्याविषयीची कल्पना यांत मोठे साम्य असते. धार्मिक म नुष्याला परमेश्वराचे जे पितृरूप दिसते, ते त्याने बालपणी अनुभवलेल्या स्वतःच्या वडिलांच्या रूपापासून फारसे वेगळे नसते.

लहान मूल असहाय्य असते. त्याला संरक्षणाची गरज असते. ही गरज आई-वडील पूर्ण करतात. तेच त्याला प्रेम देतात, संस्कार करतात आणि शिस्तही लावतात. त्यामुळे मूल आपल्या आई-वडिलांना, विशेषतः वडिलांना, सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान समजते. प्रौढ वयात ही भावना काही प्रमाणात कमी झाली, तरी विश्वाच्या अथांग पसाऱ्यात आपणही मूलतः असहाय्य आहोत आणि आपल्यालाही एखाद्या शक्तिमान संरक्षणाची गरज आहे, ही भावना कायम राहते.

जेव्हा वडील ही गरज पूर्ण करू शकत नाहीत, तेव्हा मनुष्य आपल्या बालपणीच्या वडिलांविषयीच्या अतिशयोक्त स्मृतिप्रतिमेचे सहाय्य घेतो. त्या प्रतिमेचे उन्नतीकरण आणि उदात्तीकरण करून तो देवाची संकल्पना निर्माण करतो. त्या संकल्पनेला प्रत्यक्ष अस्तित्व मानून तिच्याकडून आधार, संरक्षण आणि मार्गदर्शन मिळवण्याचा प्रयत्न करतो. स्मृतिप्रतिमेचे भावनिक बळ आणि संरक्षणाची चिरंतन गरज हे परमेश्वरावरील विश्वासाचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ ठरतात.

पिता जसा प्रेम देतो, तसाच चूक झाल्यास शिक्षा देखील करतो. सर्वसामान्य म ाणसाची देवाबद्दलची कल्पना याच स्वरूपाची असते. विश्वातील अनंत गोष्टींपासून निर्माण होणारे भय आणि त्यापासून संरक्षण मिळण्याची आशा या दोन अंतःप्रेरणांचे तर्कशुद्ध उत्तर म्हणजे मानवी मेंदूने निर्माण केलेली देवाची संकल्पना होय. हे सर्व तत्त्वज्ञान बापाचे देवात रूपांतर होण्यामागील आहे. मात्र आजच्या फादर्स डे निमित्त आपल्याला आपल्या बापातील देवत्व जपायचे आहे. आपण कितीही प्रौढ झालो, तरी आपल्या वडिलांनी आपल्यासाठी केलेले



संघर्ष, कष्ट, त्याग आणि प्रयत्न यांची स्मृती सतत ताजी ठेवली पाहिजे.

खरे तर कोणत्याही काळात बाप हा मुलांपेक्षा एक-दोन पिढ्या पुढचा असतो. त्याने आयुष्याचे अधिक उन्हाळे-पावसाळे पाहिलेले असतात. मुले कधी जगावेगळे, अचाट किंवा अव्यवहार्य स्वप्न पाहू लागतात, तेव्हा बाप त्यांना वास्तवाची जाणीव करून देतो. तो व्यवहार शिकवतो, स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे धडे देतो आणि जीवनातील जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो. बाप नकळतपणे आपल्या मुलांची सतत परीक्षा घेत असतो. त्यांची क्षमता, त्यांचे मनोबल, त्यांची धाव कुठपर्यंत आहे याची त्याला पूर्ण कल्पना असते. बाप-लेकराचे नाते मग मुलगा असो वा मुलगी, हे असे नाते असते की जे मुलांच्या भविष्याला आकार देत असते.

एका शायरच्या ओळींतून बापाचे महत्त्व अतिशय सुंदरपणे व्यक्त झाले आहे

बाप एक घर के पंखे की तरह होता है,<br>
जो घूमना बंद कर दे, तो घर के सब लोगों के पसीने छूट जाते हैं.

ही उपमा किती बोलकी आहे! बापाचे अस्तित्व घरात असते तेव्हा त्याची किंमत अनेकदा जाणवत नाही. परंतु त्याच्या सावलीत संपूर्ण कुटुंब सुरक्षित, निश्चिंत आणि सक्षमपणे जगत असते. जेव्हा नियती त्याला आपल्यापासून हिरावून घेते, तेव्हा त्याची उणीव प्रत्येक क्षणी जाणवू लागते. आयुष्यातील छोट्या-मोठ्या निर्णयांपासून ते संकटाच्या प्रसंगांपर्यंत त्याची अनुपस्थिती सतत भासत राहते.

आज फादर्स डेच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करूया. त्यांच्या संघर्षाला सलाम करूया, त्यांच्या प्रेम ाचा सन्मान करूया आणि त्यांच्या जिवंतपणीच त्यांना आपल्या मनातील आदर व प्रेमाची जाणीव करून देऊया.

**फादर्स डेच्या हार्दिक शुभेच्छा !**

**– किशोर जाधव सोलापूर**

**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# अन्यथा भारतात लोकशाही नाममात्र उरेल..?

## रविवार विशेष (कव्हर स्टोरी)



राजकारणातील अपयश हे एका घटनेचे परिणाम नसते. ते दीर्घकाळ साचत गेलेल्या चुका, दुर्लक्ष आणि चुकीच्या निर्णयांचा एकत्रित परिणाम असते. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या बाबतीतही आज नेमके तेच घडताना दिसत आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आधी आमदारांचा मोठा गट फ ुटला. त्यानंतर मंत्र्यांनी साथ सोडली. आता खासदारही वेगळा मार्ग स्वीकारण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे. या सर्व घडामोडींमुळे शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्याविषयी सहानुभूती व्यक्त करणारे अनेकजण आहेत. भाजपने डाव खेळला, सत्ता वापरली, दबाव निर्माण केला, अशा अनेक कारणांची चर्चा होते. त्यात तथ्यही असू शकते. मात्र प्रत्येक वेळी बाह्य कारणांकडे बोट दाखवताना स्वतः च्या नेतृत्वातील उणिवांकडे दुर्लक्ष करणे हा सर्वात मोठा आत्मघात ठरतो. याचा अर्थ असा नाही की, पक्षातून बाहेर पडलेले सर्वजण तत्त्वनिष्ठ आहेत किंवा त्यांनी घेतलेले निर्णय योग्यच आहेत.

एका पक्षाच्या तिकिटावर निवडून येऊन नंतर दुसऱ्या गटात जाणे हे नैतिकदृष्ट्या समर्थनीय ठरत नाही. मतदारांच्या विश्वासाशी तो केलेला व्यवहार असतो. त्यामुळे बंडखोर खासदार किंवा आमदारांवरील टीका योग्यच आहे. मात्र केवळ त्यांच्यावर टीका करून पक्षाची समस्या सुटणार नाही. प्रत्येक वेळी 'गद्दार' हा शिक्का मारून पुढे जाता येणार नाही. इतके लोक गद्दारी करण्यास तयार का झाले? त्यांना पक्षात राहण्यापेक्षा बाहेर जाणे अधिक सोयीचे का वाटले? या प्रश्नांचीही उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आता नेतृत्वाने करायला हवा. कोणत्याही पक्षात एखादा नेता नाराज होऊ शकतो. काही आमदार असंतुष्ट असू शकतात. परंतु जेव्हा एकाच पक्षातील डझनावारी आमदार, मंत्री, खासदार आणि पदाधिकारी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतात, तेव्हा त्यामागे केवळ विरोधकांचे कारस्थान असते, असे म्हणणे वास्तवाला धरून ठरत नाही. विरोधक प्रत्येक पक्षाविरोधात राजकारण करत असतात. मात्र प्रत्येक पक्षात एवढी मोठी फूट पडत नाही. याचा अर्थ समस्या बाहेर जितकी आहे, तितकीच ती घरातही आहे.

स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात शिवसेना ही कमालीची भावनिक संघटना होती. शिवसैनिकांचा आणि नेतृत्वाचा थेट संवाद होता. पक्षप्रमुख आपल्या पाठीशी उभे आहेत, असे सामान्य शाखाप्रमुखापासून खासदारापर्यंत प्रत्येकाला वाटायचे. बाळासाहेबांचे नेतृत्व हे संघटनात्म क नियमांपेक्षा भावनिक नात्यांवर उभे होते. त्यामुळे मतभेद असले तरी बंडखोरीचे धाडस फार कमी लोकांनी केले. उद्धव ठाकरे यांनी पक्षाची सूत्रे स्वीकारल्यानंतर संघटनेला अधिक शिस्तबद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यात काही प्रमाणात यशही मिळाले. मात्र त्याचवेळी नेतृत्व आणि कार्यकर्ते यांच्यातील अंतर वाढत गेले. अनेक नेते आणि कार्यकर्ते खासगीत सांगतात की, 'मातोश्री' पर्यंत पोहोचणे अत्यंत कठीण असते. भेटीसाठी मध्यस्थांची गरज पडते.

अनेकदा निर्णय प्रक्रियेतही काही म ोजक्या लोकांचे वर्चस्व वाढल्याची भावना निर्माण झाली आहे. ही भावना खरी की खोटी, हा वेगळा विषय असू शकतो. पण नेत्याला आपल्या कार्यकर्त्यांची केवळ राजकीय नव्हे, तर भावनिक गरजही ओळखावी लागते. अनेक आमदार, खासदार किंवा स्थानिक पदाधिकारी आपले प्रश्न मांडण्यासाठी पक्षप्रमुखांकडे जातात. त्यांना प्रत्येक वेळी न्याय मिळेलच असे नसते.

पण त्यांचे म्हणणे ऐकले जात आहे, त्यांना महत्त्व दिले जात आहे, ही भावना महत्त्वाची असते. जेव्हा ही भावना कमी होते, तेव्हा नाराजी वाढते. नाराजीचे रूपांतर असंतोषात होते आणि असंतोषाचे रूपांतर अखेरीस बंडात होते. गेल्या काही वर्षांत संघर्षाच्या निर्णायक क्षणी उद्धव ठाकरे पुरेशा आक्रमकतेने मैदानात उतरलेले दिसले नाहीत. शिवसेनेची राजकीय ओळख ही आक्रमकतेची होती. रस्त्यावर उतरणारा पक्ष म्हणून शिवसेना ओळखली जात होती. मात्र गेल्या काही वर्षांत ही धार बोथट झाल्याचे अनेक शिवसैनिक मानतात. हिंदुत्वाच्या प्रश्नावर असो किंवा पक्षावरील संकटांच्या काळात असो, नेतृत्व अधिक आक्रमक




भूमिका घेईल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांची होती. ती पूर्ण झाली नाही. निवडणुकीतील पराभव हादेखील

पक्षासाठी कठीण काळ असतो. अशा वेळी उमेदवारांना मानसिक आधाराची गरज असते. परंतु अनेकदा निवडणूक हरल्यानंतर संबंधित नेते एकाकी पडल्याची तक्रार करतात. याच बाबतीत उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व काही प्रमाणात कमी पडते. या उलट एकनाथ शिंदे आपल्या सहकाऱ्यांशी सातत्याने संपर्कात राहतात. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. त्यांना वेळ देतात. राजकारणात विचारसरणी महत्त्वाची असतेच, पण वैयक्तिक संबंधही तितकेच महत्त्वाचे असतात.

अनेकदा लोक पक्षापेक्षा व्यक्तीशी जोडले जातात.

एकनाथ शिंदे यांनी ही बाब प्रभावीपणे साधल्याचे दिसते. त्यामुळेच त्यांच्याकडे नेत्यांचा ओढा वाढत असल्याचे चित्र आहे. पक्षातील प्रत्येक फूट ही विरोधकांच्या कारस्थानामुळेच झाली, असा निष्कर्ष काढला, तर सुधारण्याची प्रक्रिया कधीच सुरू होणार नाही. आत्मपरीक्षण करणे हे कमकुवतपणाचे नव्हे, तर सक्षम नेतृत्वाचे लक्षण असते. इतिहासात अनेक नेत्यांनी पराभवानंतर स्वतःच्या चुका मान्य केल्या आणि त्यातून नव्याने उभारी घेतली. शिवसेना आजही महाराष्ट्रातील महत्त्वाची राजकीय शक्ती आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे अजूनही निष्ठावंत कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. पण केवळ याच भांडवलावर कायम राजकारण करता येणार नाही. आता संघटना मजबूत करावी लागेल. संवाद वाढवावा लागेल. नाराजांना ऐकून घ्यावे लागेल. निर्णय प्रक्रियेत अधिक व्यापक सहभाग द्यावा लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नेतृत्वाने कार्यकर्त्यांच्या मनात आपण त्यांच्यासाठी उपलब्ध आहोत, हा विश्वास निर्माण करावा लागेल.

आज विरोधकांच्या पक्षाला हात लावण्याची हिंमत करता आली नसती. परंतु सर्वोच्च न्यायालय निकालावर मांडी घालून बसल्याने दहाव्या अनुसूचीचे पर्यायाने भारताच्या संविधानाचे आणि लोकशाहीचे धिंडवडे निघत आहेत. सध्याचे पक्षफोडू सरकार सत्तेतून गेल्याशिवाय ही परिस्थिती बदलणार नाही. मात्र लोकशाही मजबूत ठेवायची असेल तर भविष्यात पक्षातून बाहेर पडणाऱ्या लोकप्रतिनिधीला अगोदर त्याच्या नगरसेवक,आमदार, खासदारकीचा राजीनामा द्यावा लागेल, अशी तरतूद कायद्यात करावीच लागेल. अन्यथा भारतात लोकशाही नाममात्र उरेल.

### फादर्स डे

रे फादर्स डे साजरा<br>
वडिलांसअप्रुप वाटे<br>
फुला स्विकारताना<br>
बोथट टोकदारकाटे

संगोपनार्थ मुलांच्या<br>
मूकते अहोरात्र झटे<br>
उभे राहताचं वडील<br>
समस्यापडतात थिटे

लाड पुरविता सगळे<br>
सांगा कधी मागे हटे<br>
मुरड घालून स्वतास<br>
बाळांना सगळे वाटे

भेद न करे लेकरांत<br>
प्रत्येकां समान वाटे<br>
उभे राहतात मनोरे<br>
सन्मान नमिळे विटे

रस्ताचुकता मुलांचा<br>
कडक शब्दांत दाटे<br>
समजून घ्या पप्पाले<br>
काळजी हृदयां दाटे

वरून धरणभक्कम<br>
अंतरात प्रेमाचे साठे<br>
माहीत असूनि उत्तर<br>
निरूत्तरीत प्रश्न साठे

एकशब्द आभाराचा<br>
उपकारअल्पसे फिटे<br>
बापहोईल धन्यधन्य<br>
ते भावनांचे मेघ दाटे

**– हेमंत मुसरीफ पुणे**<br>
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विषमुक्त शेतीच्या क्षेत्रात सिदूरच्या शेतकऱ्यांनी घडविला आदर्श




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** शेतीमध्ये रासायनिक खते आणि किटकनाशकांचा अतिवापर होत असल्याने जमिनीची पोत बिघडत आहे. शिवाय मानवी आरोग्यावरही त्याचे परिणाम जाणवत आहे. त्यामुळे रासायनिक खते व किटकनाशकांना फाटा देऊन कमी खर्चात सिदूर येथील शेतकऱ्यांनी विषमुक्त शेतीचा प्रयोग करुन एक नवीन आदर्श घटविला आहे. गावातील कृषिरत्न महिला पुरुष शेतकरी गटाने तब्बल ५४०० लिटर दशपर्णी अर्क तयार केला आणि २७ गांडूळ खत बेड्स तयार करुन स्मार्ट शेतीत एक नवे पाऊल टाकले आहे.

पाणी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित ' सत्यमेव जयते फार्मर कप' स्पर्धेच्या तीन दिवसीय प्रशिक्षणातून प्रेरणा घेऊन चंद्रपूर तालुक्यातील महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत काम करणाऱ्या सिदूर गावाने प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा वापर करुन एकत्रितरित्या संपूर्ण गावाचा कायापालट करण्याचा विडा उचलला आहे.

रासायनिक खते आणि किटकनाशकांना फाटा देण्यासाठी या गटाने सामूहिक कष्टातून तब्बल २०० लिटर क्षमतेचे २७ ड्रम गोळा केले. त्या माध्यमातून ५४०० लीटर 'दशपर्णी अर्क' (नैसर्गिक किटकनाशक) तयार केला आहे. यामुळे शेतकऱ्यांचा हजारो रुपयांचा खर्च वाचणार असून, विषमुक्त शेतीला मोठी गती मिळणार आहे. तसेच केवळ कीड नियंत्रणच नव्हे, तर जमिनीची सुपीकता आणि मातीचा पोत सुधारण्यासाठी या शेतकरी गटाने २७ गांडूळ खत बेड्स तयार केले आहेत. यामुळे जमिनीला उत्तम दर्जाचे सेंद्रिय खत मिळणार आहे.

## राजुरा तालुक्यातील लहान मार्डा येथे यादवकालीन अवशेष ; पुरातत्व अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांची माहिती



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** जिल्ह्यातील राजूरा तालुक्यातील वर्धा नदीकाठी वसलेले लहान मार्डा हे गाव गोंड काळापेक्षाही प्राचीन असून, येथे यादवकालीन शिवलिंग, शिव-पार्वती, गणपती व वाघोबांची मूर्ती आढळून आली, असा दावा पुरातत्व अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी केला आहे.

या प्राचीन गाव परिसरात आजही मातीची भांडी, हांडे, मडकी, अवजारे, लोखंडी शस्त्रांचे अवशेष, प्राण्यांची हाडे, दात तसेच जुन्या पाषाणयुगीन मानवांनी वापरलेली साधने आढळत असल्याचे चोपणे यांचे म्हणणे आहे. या गावच्या अभ्यासादरम्यान, सुमारे ५०० वर्षापूर्वीपासून कुणबी समाज या परिसरात वास्तव्यास होता. मात्र, वर्धा नदीच्या पुरामुळे सुमारे ६५ वर्षापूर्वी गावाचे स्थलांतर करुन नवीन गाव वसविण्यात आले.

वर्धा नदीच्या उंच काठावर सुमारे ५०० वर्षापूर्वी यादवकालीन गवळी समाजाचे गाव अस्तित्वात होते. त्यांनी तेथे उघड्या स्वरुपातील शिवमंदिराची स्थापना केली होती. मंदिरात मोठे शिवलिंग, शिव- पार्वती, गणपती तसेच वाघोबाची लहान मूर्ती स्थापित करण्यात आली होती. सध्या याच ठिकाणी या प्राचीन वास्तूचे जतन, सामाजिक जनजागृती आणि लोकशिक्षणाच्या उद्देशाने मोठे मंदिर उभारण्याचे काम सुरु आहे. गावापासून मंदिरापर्यंत जाण्यासाठी शासनाने रस्त्यालाही मंजूरी दिली आहे. यापूर्वीच महावितरणने सुमारे एक किलोमीटर वीजवाहिनी टाकून वीजपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

**वणी व राजुऱ्यात २५ हजार वर्षापूर्वी मानवाचे वास्तव्य...**

वणी व राजुरा तालुक्यातील अनेक ठिकाणी २५ हजार वर्षापूर्वी वास्तव्य करणाऱ्या मानवांनी वापरलेली दगडी अवजारे सापडली आहेत. या प्रदेशात गोंडकालीन काळापेक्षाही सातवाहन, वाकाटक आणि यादवकालीन वस्तीस्थळांचे अवशेष आढळतात. या यर्व स्थळांच्या संशोधनासाठी प्रयत्न सुरु असून, ग्रामीण भागातील नागरिकांनी जुन्या गावांची, मंदिरांची तसेच ऐतिहासिक स्थळांची माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आवाहन सुरेश चोपणे यांनी केली आहे.

## २१ जूनला संत निवृत्तीनाथांच्या पालखीचं पंढरीच्या दिशेने प्रस्थान

**दि.२०, नाशिक :** संत निवृत्तीनाथ महाराज यांची आषाढ वारी पालखी २९ जून रोजी त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. या पार्श्वभूमीवर दिंडी सोहळ्यासाठी त्र्यंबक ते नाशिकपर्यंतचा रस्ता वारकऱ्यांना उजव्या बाजूने खुला करुन देण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले. त्यामुळे पालखी मार्ग सुखकर होईल, असा आशावाद वारकरी भाविक व संत निवृत्तीनाथ महाराज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

पालखीसाठी उजवी बाजू खुली

त्र्यंबक ते नाशिक पायी पालखी सोहळा मार्ग पाहणी दौरा विविध विभागातील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला. हा मार्ग वारकऱ्यांसह इतर वाहनांसाठी गैरसोयीचा ठरत असल्याने निवृत्तीनाथ महाराज समाधी संस्थानचे अध्यक्ष राहुल महाराज साळुंखे व पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्यानुसार तहसीलदार गणेश जाधव, पोलिस निरीक्षक महेश कुलकर्णी, मुख्याधिकारी गोविंद जाधव व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मार्गाची पाहणी करुन दिंडी सोहळ्यासाठी मार्गाची उजवी बाजू खुली करण्याचे आश्वासन दिले.

नाशिक ग्रामीण व शहरी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक व पोलिस अधीक्षक डी.एस स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन बारी, सहाय्यक पोलिस आयुक्त अद्विता शिंदे आणि सातपूरचे पोलिस निरीक्षक आहेर सातपूरचे पोलिस निरीक्षक आहेर यांनी हॉटेल संस्कृती ते 'सीबीएस'पर्यंतच्या मार्गाची पाहणी केली. या मार्गाचे काम त्वरित पूर्ण करुन तो खुला केला जाईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.

**...असे होईल पालखीचे प्रस्थान**

त्र्यंबकेश्वर, पेगलवाडी, पिंपळगाव बहुला, सातपूक, पंचायत समिती नाशिक येथे स्वागत सोहळा जिल्हाधिकारी कार्यालय, काजीपुरा विठ्ठल मंदिर, गणेशवाडी मनपा शाळा, द्वारका, नाशिकरोडला बिटको, मुक्तिधाम मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (नाशिकरोड विसावा)

सिन्नरकडे मार्गक्रमण पळसे, लोणारवाडी, सिन्नर (येथे खासदार व लोकप्रतिनिधींकडून स्वागत), वावी वेस, लोंढे गल्ली, कुंडेवाडीपासून पुढे मार्गस्थ

# साठीतील शिवसेनेचा आजही तितकाच हुंकार !

वयाची साठी ओलांडली की माणूस शांत होतो, निवृत्तीचा विचार करतो, अशी सर्वसाधारण धारणा असते. मात्र काही व्यक्तिमत्त्वे आणि काही संघटना या वयाच्या चौकटीत बसत नाहीत. त्यांचा उत्साह, त्यांची जिद्द आणि जनतेसाठी लढण्याची वृत्ती काळानुसार अधिक प्रगल्भ होत जाते. अशीच वाटचाल शिवसेनेची आहे.

सुमारे सहा दशकांपूर्वी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या हक्कांसाठी शिवसेनेची स्थापना केली. मराठी अस्मिता, स्थानिकांना रोजगार, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढण्याची परंपरा शिवसेनेने निर्माण केली. अनेक चढ-उतार, राजकीय संघर्ष, सत्तेतील सहभाग आणि विरोधी पक्षाची भूमिका अशा विविध टप्प्यांतून शिवसेना अधिक मजबूत होत गेली.

गेल्या काही वर्षांत शिवसेनेत मोठी राजकीय उलथापालथ झाली आणि एका शिवसेनेतून दोन शिवसेना निर्माण झाल्या. मात्र या घडामोडींनंतरही मराठी माणूस आणि शिवसेना यांचे नाते अतूट राहिले आहे. कारण शिवसेना ही केवळ एक राजकीय पक्ष नसून महाराष्ट्राच्या अस्मितेशी जोडलेली एक भावना आहे. संघटनात्मक बदल झाले, नेतृत्वात परिवर्तन झाले, तरीही मराठी जनमानसात शिवसेनेबद्दल असलेला जिव्हाळा कायम असल्याचे दिसून येते.



आज शिवसेनेला साठ वर्षे पूर्ण झाली असली तरी तिचा लढाऊ बाणा कायम आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी, सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी आणि समाजहिताच्या विविध विषयांसाठी शिवसैनिक आजही तेवढ्याच ताकदीने काम करताना दिसतात. वय वाढले म्हणून विचारांची धार कमी झालेली नाही; उलट अनुभवाच्या बळावर ती अधिक प्रभावी झाली आहे.

राष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटवणारी शिवसेना ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची आणि पुण्याईची देण आहे. त्यांच्या नेतृत्वाने शिवसेनेला महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून देशभरात एक वेगळी ओळख मिळवून दिली. यापुढील काळातही शिवसेना सामान्य जनतेचा आवाज बनून राहील, अशी अपेक्षा असंख्य शिवसैनिक आणि समर्थक व्यक्त करतात. साठ वर्षांच्या प्रवासानंतरही संघटनेचा जनाधार, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि लोकांशी असलेली नाळ कायम आहे. संकटे आली, आव्हाने उभी राहिली, पक्षांतर्गत आणि बाह्य संघर्ष झाले; तरीही शिवसेनेने पुन्हा उभारी घेत आपले अस्तित्व सिद्ध केले आहे.

महाराष्ट्राची राजधानी जशी मुंबई आहे, तशीच शिवसेनेची राजकीय आणि संघटनात्मक राजधानीही मुंबईच राहिली आहे. मात्र काळानुसार शिवसेनेचा विस्तार मुंबई शहर आणि उपनगरांच्या पलीकडे ग्रामीण भागापर्यंत आणि ग्रामीण भागातून पुन्हा शहरी भागापर्यंत झालेला दिसतो. आज ग्रामीण भागातील कार्यकर्ते मुंबईसारख्या महानगरांमध्ये संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळताना दिसतात. यामुळे शिवसेनेची व्याप्ती अधिक व्यापक झाली असून शहर आणि गाव यांतील दुवा अधिक मजबूत होत आहे.

आजचा शिवसैनिक केवळ राजकारणापुरता मर्यादित नाही. सामाजिक उपक्रम, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य शिबिरे, रक्तदान, शैक्षणिक मदत आणि जनजागृती अशा अनेक क्षेत्रांत तो सक्रिय आहे. त्यामुळे शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून सामाजिक बांधिलकी जपणारी चळवळ म्हणूनही ओळखली जाते.

साठ वर्षांचा हा प्रवास म्हणजे केवळ इतिहास नाही, तर संघर्ष, त्याग आणि जनसेवेचा वारसा आहे. म्हणूनच शिवसेनेच्या वाटचालीकडे पाहताना एकच भावना व्यक्त होते

साठीतही तितकाच हुंकार!

कारण काळ बदलला, परिस्थिती बदलली, राजकीय समीकरणे बदलली; परंतु मराठी माणसाच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा, सामान्य जनतेशी असलेली बांधिलकी आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचा अभिमान आजही तितक्याच ताकदीने शिवसेनेच्या विचारांतून आणि कार्यकर्त्यांच्या कृतीतून व्यक्त होत आहे.

**- विकास दळवी**
**पत्रकार**
**दै. अक्षराज, ठाणे प्रतिनिधी**

# विठुरायाच्या दर्शनासाठी लालपरी सज्ज !

## आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरातून धावणार तब्बल ५५०० बसेस

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२०, मुंबई :** आषाढी एकादशीनित्त पांडुरंगाच्या दर्शनासाठी पांढपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी सरकारने मोठी घोषणा केली आहे.

सरकारच्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात आणि विठ्ठल विठ्ठलच्या अखंड नामस्मरणात पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेली एसटी महामंडळाची लाडकी लालपरी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी ५ हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले असून, राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भाविकांच्या सेवेला




सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे विठुरायाच्या दर्शनाचा प्रवास अधिक किफायतशीर आणि सुलभ होणार आहे.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती.

यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे.वारी दरम्यान रात्रंदिवस सेवा बजावणारे चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था केली आहे. सुमारे १३ हजार कर्मचारी या सुविधेचा लाभ घेणार असून, सेवाभावाने कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांप्रती मंत्री सरनाईक यांनी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे.

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनासोबत खांद्याला खांदा लावून कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होऊन भाविकांचा प्रवास सुलभ होणार आहे.

दरम्यान भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्यभरातील भाविकांनी एसटीच्या सुरक्षित, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख सेवांचा लाभ घेत विठुरायाच्या दर्शनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा या भावनेतून एसटी यंत्रणा संपूर्ण यात्राकाळात अहोरात्र सेवेसाठी तत्पर राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## सभापती कलावती पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण संपन्न

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२०, पेण :** पेण नगरपरिषदेच्या नगरसेविका तथा महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पेण शहरातील प्रभाग क्रमांक एक मधील गणपती विसर्जन घाट परिसरात वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे याच दिवशी नंदिमाळ नाका ते विश्वेश्वर मंदिर या भागातील काँक्रिटिकन रस्त्याचे भूमिपूजन देखील करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील,उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील यांसह पेण पालिकेचे सर्व सभापती, नगरसेवक, नगरसेविका, शहरातील हितचिंतक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी पर्यावरणाचा समतोल राखून आपली जबाबदारी लक्षात घेता सभापती कलावती पाटील यांनी जे पाऊल उचलले आहे ते कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

सध्याचे वातावरणातील चित्र लक्षात घेता लांबणीवर गेलेला पाऊस पाहता झाडे लावणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे वाढदिवसाचे औचित्य साधून पेण पालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी विशेष करून ज्या ठिकाणी नेहमी वर्दळ असते आणि त्याच ठिकाणी गणपती



बाप्पाचे विसर्जन घाट आहे अशा ठिकाणी नदीकिनारी झाडे लावणे ही काळाची गरज आहे हे लक्षात घेता कलावती पाटील यांनी या ठिकाणी वृक्षारोपण करण्याचा योग्य निर्णय घेतला आणि तो कार्यक्रम नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या उपस्थितीत पार पडण्यात आला. त्याचप्रमाणे याच प्रभागातील गणपती बाप्पाच्या मिरवणुकीचा मार्ग असणाऱ्या नंदिमाळ नाका ते विश्वेश्वर मंदिर भागातील रस्त्याचे भूमिपूजन देखील पार पडण्यात आले. यावेळी बोलताना सभापती कलावती पाटील यांनी इतर विकासकामे करत असताना पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज असून त्याला आम्ही प्राधान्य दिला आहे, प्रभागातील सर्वसमावेशक कामे करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असणार असल्याचे सांगितले. तर नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी कलावती पाटील यांनी पर्यावरणाच्या बाबत जबाबदारी लक्षात घेऊन हा पुढाकार घेतला आहे त्याचे आम्ही स्वागत करत असून त्यांनी पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे शिक्षिका,मुख्याध्यापिका म्हणून विद्यार्थी घडवले, आता त्याच नगरसेविका म्हणून प्रभागाचा विकास करण्यात मोलाचा हातभार लावत आहेत याचे आम्हाला अभिमान असल्याचे सांगितले.

# मंजूर घरकुलांची रक्कम अडवून ठेवल्याने कातकरी समाजाला उघड्यावर राहण्याची वेळ

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण :** जनमत आवास योजनेंतर्गत धनगरवाडी - तारळे येथील कातकरी समाजातील लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या घरकुल हप्त्याची रक्कम अडवून ठेवल्याने पावसाळ्याच्या तोंडावर घरकुलांची कामे अपूर्ण राहिल्यामुळे कातकरी समाजाला उघड्यावर राहण्याची वेळ आणलेल्या शासकीय यंत्रणेवर काम करणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत मंजूर घरकुल अनुदानाची रक्कम दोन दिवसांत लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करावी

अन्यथा सोमवार पासून जिल्हाधिकारी सातारा यांच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा तारळे येथील कातकरी समाजाने सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

या निवेदनात त्यांनी पुढे म्हणले आहे की धनगरवाडी, तारळे, ता. पाटण, जि. सातारा येथील कातकरी (अनुसूचित जमाती) समाजातील जनमन आवास योजनेचे पात्र लाभार्थी आहोत. जनमन आवासयोजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांच्या अनुदानाची रक्कम आमच्या बँक खात्यांमध्ये जमा झाल्याचे संदेश प्राप्त होऊन एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी लोटला आहे. तथापि, संबंधित खात्यांवर होल्ड असल्यामुळे मंजूर अनुदानाची स्वकम लाभार्थ्यांना अद्याप प्राप्त झालेली नाही.



**न्याय हक्काच्या घरासाठी लढा.. आदिवासी बांधवांच्या पाठीशी**
**– मराठा सेवक राजेंद्र निकम**

आमच्या तारळे भागातील कातकरी आदिवासी बांधवांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांचे पहिले टप्प्याचे (फाउंडेशन) काम पूर्ण होऊन एक महिना उलटला आहे. मात्र, अत्यंत दुर्दैवी बाब म्हणजे लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम वर्ग झाल्यानंतर गटविकास अधिकारी पाटण कार्यालयामार्फत तांत्रिक कारणास्तव त्या रकमेवर स्थगिती (स्टे) देण्यात आली आहे. गेल्या महिनाभरापासून लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे असूनही ते काढता येत नसल्याने घरांचे बांधकाम पूर्णपणे ठप्प झाले आहे. एन पावसाळ्यात कातकरी बांधवांना उघड्यावर व पालांमध्ये राहण्याची वेळ आली आहे. या गंभीर प्रश्नाबाबत तात्काळ कारवाई झाली नाही तर समस्त आदिवासी बांधवांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. कातकरी आदिवासी बांधवांना त्यांचे हक्काचे घर आणि न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील..! असा इशारा मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे समर्थक राजेंद्र निकम, प्रवीण उदुगडे, तसेच वीजीएनटी चे नेते अनिल माने यांनी दिला आहे.

यासंदर्भात आम्ही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे वारंवार प्रत्यक्ष भेटी देऊन देखील कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. अनेक लाभार्थ्यांनी घरकुल बांधकामासाठी कर्ज काढून तसेच स्वतःच्या अत्यंत मर्यादित आर्थिक साधनांमधून कामे सुरू केली आहेत. मात्र मंजूर हप्ता वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे घरकुलांची बांधकामे रखडली असून लाभार्थ्यांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे.

सध्या पावसाळ्याचा कालावधी सुरू झाला असून अनेक कुटुंबे कुडाच्या झोपड्या व तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये राहत आहेत. या कुटुंबांमध्ये महिला, गर्भवती माता, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असून त्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने मंजूर केलेल्या योजनेचा लाभ केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने कातकरी समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यांवरील होल्ड त्वरित हटविण्याबाबत आवश्यक निर्देश द्यावेत व जनमन आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेली अनुदानाची रक्कम तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी. तसेच सदर प्रकरणातील विलंबाबाबत सखोल चौकशी करून, संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करत अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या योजनेपासून वंचित ठेवणे ही अत्यंत गंभीर बाब असून, आवश्यकतेनुसार संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार पुढील कार्यवाही करण्याचा अधिकार लाभार्थ्यांकडे राखून ठेवण्यात येत आहे. तरी आपण या गंभीर प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून कातकरी (डढ) समाजातील गरीब व वंचित लाभार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा अन्यथा, सोमवार दिनांक २२/०६/२०२६, रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांच्या येथे आम्हाला आमच्या न्याय्य हक्कांसाठी आंदोलन करण्यास भाग पडेल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

# पंढरपूर तहसीलवर आ.अभिजित पाटील यांच्या नेतृत्वात हजारो शेतकऱ्यांचा एल्गार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** महावितरणच्या जाचक लोडशेडिंगमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या संतापाचा आज पंढरपूर तहसील कार्यालयावर उद्रेक झाला. माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजित आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकऱ्यांनी रखरखत्या उन्हात तहसील कार्यालयावर भव्य धडक मोर्चा काढत प्रशासनाला धारेवर धरले. या मोर्चामुळे संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधले गेले असून शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नाने पुन्हा एकदा ऐरणीवर स्थान मिळवले आहे.

मोर्चात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी वीज द्या, पीक वाचवा, लोडशेडिंग बंद करा, शेतकऱ्यांना न्याय द्या अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून सोडला. तहसीलदार सचिन लंगोटे आणि महावितरणचे अधिकारी साळी यांनी मोर्चेकऱ्यांचे निवेदन स्वीकारले.

यावेळी बोलताना आमदार अभिजित पाटील यांनी प्रशासन आणि महावितरणवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, एकीकडे पाऊस नसल्याने शेतकरी संकटात सापडला आहे, तर दुसरीकडे विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे त्याच्या अडचणीत भर पडत आहे. ऊस, द्राक्षे, डाळिंब, केळी यांसारखी लाखो रुपयांची पिके शेतात उभी आहेत. वेळेवर पाणी मिळत नसल्याने पिके करपू लागली आहेत. अशा परिस्थितीत लोडशेडिंगचा फटका शेतकऱ्यांना असह्य होत आहे. महावितरणकडून संध्याकाळी ६ ते पहाटे ४ वाजेपर्यंत वीजपुरवठा बंद ठेवण्याचे आदेश असल्याचे सांगितले जात असताना, उर्वरित कालावधीतही शेतकऱ्यांना पुरेशी आणि नियमित वीज मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला.

किमान सात तासांचा अखंड वीजपुरवठा तरी शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. नियमांच्या चौकटीबाहेर आमची कोणतीही मागणी नाही; मात्र नियमानुसार मिळणारा वीजपुरवठा सुरळीत मिळालाच पाहिजे, अशी ठाम भूमिका यावेळी मोर्चेकऱ्यांनी मांडली. सध्या दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने नदीपात्रातून पाणी उपसा करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर विजेची गरज आहे. मात्र केवळ दोन तास वीज उपलब्ध होत असल्याने पिकांना पाणी देणे अशक्य होत असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. आज पिकांना पाणी हवे आहे; वेळ निघून गेल्यानंतर दिलासा देऊन काही उपयोग नाही, अशा शब्दांत मोर्चात सहभागी शेतकऱ्यांनी आपली व्यथा मांडली.



मोर्चानंतर तहसील कार्यालयासमोर झालेल्या सभेत राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व्यापार सेलचे अध्यक्ष नागेश फाटे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानाजी बागल, बाळासाहेब देशमुख, जिल्हा परिषद सदस्य संतोष बागल, भारत कोरके, अमित साळुंखे, पंचायत समिती सदस्य शहाजी मुळे, सोमनाथ झांबरे, दीपक पवार, मनसेचे शशिकांत पाटील, अण्णा महाराज भुसनर, माऊली जवळेकर, दत्ताभाऊ बागल, निवास भोसले, तुकाराम मस्के, दिनकर चव्हाण, समाधान गाजरे, धनंजय गुळमे यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

**२२ जूनपासून अधिवेशनात**
**विजेचा प्रश्न गाजणार**

यावेळी आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले की, २२ जूनपासून सुरू होणाऱ्या मुंबई अधिवेशनात शेतकऱ्यांच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न सातत्याने मांडणार आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी सौर ऊर्जेचा पर्याय स्वीकारण्यासाठी पुढाकार घ्यावा. अधिकाधिक सोलर प्रकल्प उभारल्यास डीपीवरील ताण कमी होईल आणि भविष्यातील वीज संकटावरही तोडगा निघू शकतो.

**शेतकऱ्यांचा स्पष्ट इशारा !**

महावितरणने तातडीने वीजपुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा यापेक्षा तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा मोर्चाच्या माध्यमातून देण्यात आला. हजारोंच्या संख्येने सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या या एल्गारामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून आता महावितरण कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# खडक माळेगावात बिबट्याचा थरार कायम; २ बिबटे जेरबंद होऊनही शेतकऱ्यावर भीषण हल्ला

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील खडक माळेगाव येथे बिबट्याची दहशत संपण्याचे नाव घेत नसून, शुक्रवारी (दि.१९ जून) दुपारी अडीच वाजेच्या सुमारास शेतात काम करणाऱ्या एका शेतकऱ्यावर बिबट्याने अचानक प्राणघातक हल्ला केला. या भीषण हल्ल्यात बाबुराव गंगाराम आहेर (नंदीवाले) हे गंभीर जखमी झाले आहेत. लागोपाठ दोन बिबटे जेरबंद केल्यानंतरही तिसऱ्या बिबट्याने हल्ला केल्यामुळे संपूर्ण परिसरात घबराटीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**गवत कापत असताना**

**अचानक झडप :** मिळालेल्या माहितीनुसार, बाबुराव आहेर हे दुपारी अडीच वाजेच्या सुमारास आपल्या



बागेत गवत कापत होते. यावेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक झडप घातली. या अनपेक्षित हल्ल्यात आहेर यांच्या पाठीवर आणि शरीराच्या इतर भागांवर बिबट्याच्या नखांमुळे व दातांमुळे खोल जखमा झाल्या आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**१५ दिवसांत दोन बिबटे**

**झालेत जेरबंद :**

खडक माळेगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर प्रचंड वाढला आहे. वनविभागाने यापूर्वी या भागात धडक कारवाई केली आहे:

**५ जून :** परिसरातील एका पॉलिहाऊसमध्ये शिरलेल्या बिबट मादीला वन विभाग व निफाड बचाव पथकाने सुरक्षितपणे पकडले होते.

**८ जून :** अवघ्या तीन दिवसांनंतर, रामेश्वर शंकर शिंदे यांच्या कांदा चाळीच्या जाळीत अडकलेल्या दुसऱ्या बिबट्यालाही वनविभागाने जेरबंद केले होते.

लागोपाठ दोन बिबटे पकडूनही परिसरात आणखी बिबट्यांचा मुक्त वावर असल्याचे आजच्या हल्ल्यावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे परिसरात अजून किती बिबटे आहेत? असा प्रश्न आता ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

**वनविभागाचे बचाव पथक**
**घटनास्थळी दाखल**

घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपरिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ व वनरक्षक विजय दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड बचाव पथक तातडीने खडक माळेगावात दाखल झाले. बचाव पथकातील ज्ञानेश्वर पवार, सादिक शेख, वैभव दौंड, विजय माळी, काशिनाथ माळी, शरद चांदोरे, सागर दुसिंग व भारत माळी यांनी घटनास्थळाची पाहणी केली असून पुढील उपाययोजना सुरू केल्या आहेत.

## थोडक्यात

# पाचगाव येथे शेतकरी मार्गदर्शन मेळावा

**अक्षराज : चंद्रकांत भोयर**

**दि.२०, राजुरा :** दर्जेदार पीक उत्पादनासाठी योग्य बियाणे निवड, बीज प्रक्रिया आणि हवामान अनुकूल शेती पद्धतीचा अवलंब करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन नागपूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाडगे यांनी केले आहे. (ता.१९) शुक्रवारी पाचगाव येथे आयोजित शेतकऱ्यांची भेट व मार्गदर्शन मेळाव्यात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. पाचगाव येथील संस्कृती महिला बचत गट आणि सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत सहभागी भूमीपुत्र शेतकरी गट यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी गावातील प्रगतशील शेतकरी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या भेटीदरम्यान विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाडगे यांनी एल निनोच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शेतीत करायच्या विविध उपाययोजनांवर सविस्तर प्रकाश टाकला. बदलत्या हवामानाचा अंदाज घेऊन हवामान अनुकूल धान लागवड पद्धतीचा वापर करावा, तसेच जमिनीच्या सुपीकता निर्देशांकानुसारच योग्य ती खतमात्रा द्यावी, असे त्यांनी सांगितले. रासायनिक खतांचा वापर कमी करून जैविक निविष्ठांचा वापर वाढवण्याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून महत्त्वपूर्ण तांत्रिक माहिती दिली. कार्यक्रमात पुढे बोलताना उपविभागीय कृषी अधिकारी राजुरा जाधव यांनी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. शेतीचा खर्च कमी करण्यासाठी आणि जमिनीचे आरोग्य टिकवण्यासाठी शेतकऱ्यांनी हिरवळीच्या खतांचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच बाजारपेठेतून बियाणे, खते आणि कृषी औषधे खरेदी करताना शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी सतर्क केले.

तालुका कृषी अधिकारी राजुरा विनायक पायघन साहेब यांनी कापूस उत्पादकता अभियान म्हणजेच 'कपास क्रांती' योजनेची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली. कापसाचे एकरी उत्पादन वाढवण्यासाठी अति घन लागवड पद्धत (एचडीपीएस) आणि जवळच्या अंतरावरील लागवड (सीएस) किती फायदेशीर आहे, हे त्यांनी उदाहरणांसह पटवून दिले. सोबतच एकात्मिक पीक व्यवस्थापन (आयसीएम) पद्धतीचे महत्त्व आणि त्याचे होणारे आर्थिक फायदे सांगून शेतकऱ्यांना आधुनिक कापूस लागवडीचे तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. तत्पूर्वी, कार्यक्रमाची पार्श्वभूमी, मुख्य उद्देश आणि आयोजनाची कारणे उप-कृषी अधिकारी गांदगीवार यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून स्पष्ट केली.

या महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मेळाव्यास कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष तिरुपती नंदुरकर, आत्मा प्रकल्पाचे तालुका अध्यक्ष रुपेश गडेकर, अंबुजा फाउंडेशनचे प्रक्षेत्र अधिकारी गोपाल जंबुलवार आणि मंडळ कृषी अधिकारी वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहायक कृषी अधिकारी शिवाजी सोनकांबळे, जयपालसिंग जे. परमार, कृष्णा ठोंबरे, स्वप्निल वाव्हळ यांनी सहकार्य केले. या प्रसंगी संस्कृती महिला बचत गटाचे सर्व सदस्य, भूमीपुत्र पुरुष शेतकरी बचत गटाचे सदस्य आणि गावातील प्रगतशील शेतकरी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूरच्या मत्स्यव्यवसायाला चालना

## जिल्ह्यातील झिंगा पालन व्यवसायाला नवी दिशा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील झिंगा पालन व्यवसायाला गती देण्यासाठी आवश्यक असलेल्या टायगर प्रॉन्स (झिंगा) जातीच्या उच्च दर्जाच्या बियाण्यांचा पुरवठा शासनामार्फत उपलब्ध करून देण्याबाबत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत मत्स्यव्यवसाय विभागाने मंत्रालयात उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन केले आहे. ना.नितेश राणे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २५ जून रोजी सायंकाळी ५ वाजता मंत्रालयात होणाऱ्या या बैठकीत सुमारे ३ कोटी झिंगा बीज उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होणार असून, यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील जलस्रोतांचा प्रभावी वापर करून मत्स्य उत्पादन वाढविणे, मत्स्यपालकांचे उत्पन्न वाढविणे आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना देणे या उद्देशाने शासनाकडे विशेष पाठपुरावा केला होता. त्यानुसार मत्स्यव्यवसाय विभागाने मंत्रालय स्तरावर संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली असून, जिल्ह्यातील झिंगा पालन व्यवसायाच्या विस्तारासाठी आवश्यक उपाययोजनांवर निर्णय घेतला जाणार आहे.

बैठकीस मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव, आयुक्त, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. मत्स्यव्यवसाय मंत्री म्हणून कार्यरत असताना आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्यातील मच्छीमार बांधवांच्या कल्याणासाठी आणि मत्स्यव्यवसायाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक ऐतिहासिक व दूरगामी निर्णय घेतले. नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्याचा देशातील पहिला निर्णय, मत्स्यव्यवसायिकांसाठी किसान क्रेडिट कार्ड व डिझेल परतावा योजना, तलाव खोलीकरणास प्रोत्साहन, मत्स्य सहकारी संस्थांवरील १५०० किलो उत्पादनाचे बंधन रद्द करणे, तसेच स्वतंत्र आर्थिक कल्याणकारी मंडळाची स्थापना यांसारखे महत्त्वपूर्ण निर्णय त्यांच्या कार्यकाळात घेण्यात आले. याशिवाय मत्स्य संवर्धन, मत्स्यबीज उत्पादन, प्रशिक्षण, मार्केटिंग, मूल्यवर्धन आणि रोजगारनिर्मितीला चालना देणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून राज्यातील मत्स्यव्यवसायाला नवी दिशा देण्याचे काम त्यांनी केले.